**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धी पत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कचरा व्यवस्थापन सर्वोत्तम**
- **राष्ट्रीय स्तरावरील स्कॉच पुरस्काराने गौरव**

मिरा-भाईंदर, १२ मार्च २०२५: मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कचरा व्यवस्थापन देशात सर्वोत्तम ठरले आहे. कचरा वर्गीकरणासाठी तयार करण्यात आलेल्या क्यूआर प्रणालीची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून त्याला २०२५ चा प्रतिष्ठित SKOCH राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असते त्यासाठी विविध आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत असतात. याचाच एक भाग म्हणून ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने क्यूआर प्रणाली लागू केली होती. नागरिकांनी या प्रणालीचा चांगला प्रतिसाद दिला आहे.

या प्रणालीमुळे शहरातील कचरा संकलन अधिक सुव्यवस्थित झाले असून तक्रारींच्या निवारणाचा वेग वाढला तसेच शहरातील स्वच्छतेत मोठी सुधारणा झाली आहे. याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. या प्रणालीला २०२५ चा प्रतिष्ठित SKOCH पुरस्कार मिळाला आहे. हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो.

SKOCH पुरस्कारासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. अंतिम फेरीत विजयासाठी देखील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले. ३० जानेवारी २०२५ ते ३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत झालेल्या मतदानात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्यू-आर आधारित कचरा व्यवस्थापन प्रणालीसाठी नागरिकांनी आपला बहुमूल्य वेळ देऊन मतदान केले. शहरातील सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांनी या उपक्रमाला पाठिंबा दिला. नागरिकांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि एकत्रित प्रयत्नांमुळे महापालिकेला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळवता आला.या यशामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रतिमा देशभर उंचावली असून स्वच्छतेच्या बाबतीत महानगरपालिका आदर्श मॉडेल म्हणून पुढे आली आहे.

महानगरपालिकेच्या या ऐतिहासिक यशाचे श्रेय महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त आणि संपूर्ण महापालिका टीमच्या अथक परिश्रमांना जाते. महापालिकेच्या या उपक्रमामुळे मिरा भाईंदर शहर स्वच्छतेच्या बाबतीत देशातील आघाडीच्या शहरांमध्ये समाविष्ट झाले आहे.

काय आहे क्यूआर प्रणाली?

ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने क्यूआर प्रणाली लागू केली होती. स्वच्छ एमबीएमसी ॲपद्वारे नागरिकांना त्यांच्या परिसरातील कचरा व्यवस्थापनासंदर्भात तक्रारी नोंदवता येतात तसेच त्वरित निराकरणाची प्रक्रिया पार पाडली जाते. या प्रणालीमुळे शहरातील कचरा संकलन अधिक सुव्यवस्थित झाले असून, तक्रारींच्या निवारणाचा वेग वाढला आहे. नागरिकांना या प्रणालीचा उपयोग केल्यामुळे शहरातील स्वच्छतेत मोठी सुधारणा झाली आहे.